एम.एच.एम.एम.१८-००३६९२-२०१३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २२/११/२०१३. | | |
| नोंदणी दिनांक | : | २२/११/२०१३. | | |
| निकाल दिनांक | : | ०५/०८/२०२६. | | |
| कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | १२ | ०८ | १४ |
| निशाणी क्र. | : | ९ | | |

## भाग अ

| | | |
|---|---|---|
| प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ७१ वे न्यायालय,<br>बांद्रा, मुंबई यांचे न्यायालय.<br><br>(पिठासीन न्यायाधीश– श्री सं. मो. घुगे)<br>(J.O.Code–MH2587) | | |
| प्रकरण क्र.९६८/पी.एस./२०१३<br>(सी.एन.आर. क्र. एम.एच.एम.एम.१८–००३६९२–२०१३) | | |
| गुन्हा नोदं क्र.३८४/२०१२, पोलीस स्थानक– वाकोला, मुंबई.<br>भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ अन्वये. | | |
| अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र शासन मार्फत ठाणे अंमलदार,<br>पोलीस स्थानक– वाकोला, मुंबई. |
| अभियोग पक्षातर्फे | : | सहाय्य्क सरकारी अभियोक्ता<br>श्री डी. एस. पाटील. |
| | | शोभा नारायण दासगांवकर.<br>वय : ५० वर्षे,<br>व्यवसाय : गृहिणी.<br>राहणार : सांताक्रुझ (पू), मुंबई. |

| | | |
|---|---|---|
| आरोपीतर्फे विधि | : | श्री जे. एल. तिवारी . |

## भाग ब
( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २५/०८/२०१२. |
| तक्रार दाखल दिनांक | : | २५/०८/२०१२. |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | : | २२/११/२०१३. |
| आरोपी यांच्याविरुध्द् दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | ११/०२/२०२०. |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | ३१/०७/२०२६. |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | ०४/०८/२०२६. |
| न्यायनिर्णय दिनांक | : | ०५/०८/२०२६. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | : | निरंक |

## आरोपी यांची माहिती

| आरोपी क्र. | आरोपी यांचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.चे कलम अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | शोभा नारायण दासगांवकर . | २५/०८/२०१२ | २५/०८/२०१२ | भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ अन्वये | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग क
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ अन्वये)
## सरकारी पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षाचे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार

| (अ) | सरकारी पक्षाचे साक्षीदार – | | |
|---|---|---|---|

| सा. क्र. | साक्षीदार यांची नावे | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| (१) | उर्मिला नंदलाल सिंग | फिर्यादी | (नि.क्र.८) |

| (ब) | बचाव पक्षाचे साक्षीदार – | | |
|---|---|---|---|

| सा. क्र. | साक्षीदार यांची नावे | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

| (क) | न्यायालयामार्फत साक्षीदार – | | |
|---|---|---|---|

| सा. क्र. | साक्षीदार यांची नावे | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## सरकार पक्षातर्फे / बचाव पक्षातर्फे / न्यायालयातर्फे देण्यात आलेले निशाणी क्रमांक

| (अ) | सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले निशाणी क्रमांक – |
|---|---|

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रंमांक |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

| (ब) | बचाव पक्षातर्फे देण्यात आलेले निशाणी क्रमांक – |
|---|---|

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

| (क) | न्यायालयामार्फत देण्यात आलेले निशाणी क्रमांक – |
|---|---|

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

| (ड) | महत्वपूर्ण मुदर्देमाल (Material Object) – |
|---|---|

| अ.क्र. | महत्वपूर्ण मुदर्देमाल (Material Object) | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
### (घोषित दिनांक ०५ ऑगस्ट २०२६)

आरोपी यांच्याविरुध्द् भारती दंड संहिताचे कलम ३३६ अन्वये गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

२. अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः

दि.२५/०८/२०१२ रोजी, सुमारे ०४.०० वाजता, मुरली यादव चाळ, रुम क्र.५६७, चौथा गोळीबार रोड, सांताक्रुझ–पू. मुंबई येथे आरोपी यांनी जुन्या भांडणाचा राग मनात ठेवून फिर्यादी उर्मिला नंदलाल सिंग यांच्या राहत्या घराच्या दरवाजावर ॲसिड टाकून फिर्यादी यांची वैयक्तिक सुरक्षा किंवा इतरांची वैयक्तिक सुरक्षा धोक्यात आणली. म्हणून फिर्यादीने पोलीस स्थानक वाकोला येथे सदर घटने बाबत आरोपीच्या विरुध्द् फिर्याद नोंदवली.

३. वाकोला पोलीस स्थानकाचे अंमलदार यांनी सदर तक्रारीन्वये अपराध क्र.३८४/२०१२, भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ अन्वये नोंद केला व त्याचा तपास पोलीस ऊप निरिक्षक श्री किसन शिरसाट यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. तपासादरम्यान आरोपीला अटक केली. घटनास्थळावर जावून त्यांनी पंचासमक्ष पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तपासाअंती आरोपी यांच्याविरुध्द् न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. प्रस्तूत कामी आरोपी न्यायालयात हजर झाल्या. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीच्याविरुध्द् भारतीय दंड विधान कलम ३३६ अन्वये दोषारोप (नि.क्र.२) ला निश्चित केले आहे व दोषारोप पत्रातील मजकूर आरोपी यांना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला आहे. परंतु आरोपी यांनी आरोप नाकारले व प्रकरण चालवण्याची विनंती केली.

५. अभियोग पक्षातर्फे केवळ फिर्यादी उर्मिला नंदलाल सिंग (सा.क्र.१) यांची साक्ष (नि.क्र.८) वर नोंदवण्यात आली आहे. आरोपी यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही.

६. वारंवार संधी देवूनसुध्दा् अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली नाही. प्रस्तूत प्रकरणातील बळीत फिर्यादी यांनी न्यायालयाबाहेर सदरचा वाद मिटला आहे असे सांगितले आहे. अशा परिस्थितीमध्ये इतर साक्षीदार तपासून देखील अभियोग पक्षास उपयोगाचे ठरणार नाही. सदरील खटल्यामध्ये तडजोड झाल्यामुळे तडजोडीचा अर्ज (नि.क्र.६), पुर्सिस (नि.क्र.७) आणि दि.०५/०८/२०२६ रोजी (नि.क्र.१) वरील पारित आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

७. अभियोग अभियोग पक्षामार्फत पुरावा सादर करण्यात आला. आरोपी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये संपरिक्षा दि.०५/०८/२०२६ रोजी (नि.क्र.१) वरील पारित आदेशान्वये रदद् करण्यात आली.

८. अभियोग पक्षातर्फे विव्दान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी. एस. पाटील व आरोपी यांच्यातर्फे विव्दान विधिज्ञ श्री जे. एल. तिवारी यांचा समग्र युक्तिवाद ऐकण्यात आला.

९. उपलब्ध पुरावा व सादर करण्यात आलेला युक्तिवाद यावरुन खालील मुदद्‌ माझे विचारार्थ निष्पन्न झाले. सदर मुद्दयांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे –

| अ.क्र. | मुदद्‌ | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे शाबीत केले आहे का की, दि.२५/०८/२०१२ रोजी, सुमारे ०४.०० वाजता, मुरली यादव चाळ, रुम क्र.५६७, ४था गोळीबार रोड, सांताक्रुझ–पू. मुंबई येथे मयत आरोपी यांनी हलगर्जीपणे आणि अविचाराने फिर्यादी उर्मिला नंदलाल सिंग यांच्या राहत्या घराच्या दरवाजावर ॲसिड टाकल्यामुळे फिर्यादी यांचे मानवी जीवन किंवा इतरांची वैयक्तिक सुरक्षा धोक्यात आणली आणि आरोपी यांनी भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ अन्वये गुन्हा केला ? | | नकारार्थी |
| २ | आदेश काय ? | | आरोपी यांना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

<u>कारणमिमांसा</u>

१०. प्रस्तूत आरोपी यांच्याविरुध्द्‌ गुन्हा शाबीत करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे केवळ फिर्यादी उर्मिला नंदलाल सिंग (सा.क्र.१) यांचा तोंडी पुरावा (नि.क्र.८) वर नोंदविण्यात आला आहे.

<u>मुददा क्र.१ करिता</u> –

११. फिर्यादी उर्मिला नंदलाल सिंग (सा.क्र.१) यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. फिर्यादी उर्मिला नंदलाल सिंग यांनी त्यांची साक्ष (नि.क्र.८) मध्ये असे

सांगितले आहे की, त्या आरोपींना ओळखतात. ते त्यांचे शेजारी होते. पुष्कळ वर्षे झालेली आहेत त्यामुळे त्यांना घटनेबाबत काहीही आठवत नाही. फिर्यादीवर त्यांची स्वाक्षरी आहे परंतु त्यातील मजकूर त्यांना माहित नाही.

१२. फिर्यादी उर्मिला नंदलाल सिंग (सा.क्र.१) हया पूर्वी दिलेल्या बयानाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकिलांनी त्यांची उलट तपासणी घेतली. परंतु, उलट तपासात सरकारी वकिलांनी सुचवलेले प्रत्येक कथन त्यांनी नाकारले. त्यांच्या उलट तपासणीत अशी कोणतीच बाब आली नाही की, ज्याचा फायदा अभियोग पक्षास होईल. त्यांची साक्ष अभियोग पक्षास उपयोगी पडणारी नाही.

१३. फिर्यादी उर्मिला नंदलाल सिंग (सा.क्र.१) हया अभियोग पक्षास सहाय्य करत नाहीत. अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांना हजर केले नाही. अभियोग पक्षाकडे असा कोणताही पुरावा नाही की, आरोपी यांनी दि.२५/०८/२०१२ रोजी, सुमारे ०४.०० वाजता, मुरली यादव चाळ, रुम क्र.५६७, ४था गोळीबार रोड, सांताक्रुझ–पू. मुंबई येथे हलगर्जीपणे आणि अविचाराने फिर्यादी उर्मिला नंदलाल सिंग यांच्या राहत्या घराच्या दरवाजावर ॲसिड टाकल्यामुळे फिर्यादी यांचे मानवी जीवन किंवा इतरांची वैयक्तिक सुरक्षा धोक्यात आणली म्हणून आरोपी पुराव्या अभावी निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. अभियोग पक्षाला वारंवार संधीदेवूनही त्यांनी इतर साक्षीदारांना न्यायालयासमोर हजर केलेले नाही. प्रकरण अत्यंत जुने असून फिर्यादी व आरोपी यांच्यामधील वाद संपूष्टात आल्याचे त्यांनी सांगितले. आरोपीविरुध्द् गुन्हा सिध्द् होईल इतपत पुरावा अभिलेखावर आलेला नाही. परिणामी मुददा् क्र.१ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे. मुददा् क्र.२च्या उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>मद्दा क्र.२ करीता</u> –

१४. मुददे् क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी असल्याने आरोपी या गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अ. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ या गुन्हयातून आरोपी शोभा नारायण दासगांवकर यांना निर्दोष मुक्त करण्यात येते.

ब. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७ (अ) नुसार आरोपी यांनी रु.१५,०००/– चा त्यांचा वैयक्तिक व जातमुचलका बंधपत्र पुरवावे.

क. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2026.08.05 18:21:49 +0530

(सं. मो. घुगे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
७१वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.

दि. ०५/०८/२०२६
सराद

श्रुतलेखन दिनांक - ०५/०८/२०२६.
प्रतिलेखन दिनांक - ०५/०८/२०२६.
स्वाक्षरी दिनांक - ०५/०८/२०२६.
सराद

## प्रमाणपत्र

| | |
|---|---|
| मी प्रतिज्ञेवर कथन करतो की, या पी.डी.एफ. न्यायानिर्णयातील सर्व शब्द मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे आहेत. | |
| न्यायालय | प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,<br>७१वे न्यायालय, बांद्रा, मुंबई. |
| लघुलेखकाचे नाव | संदिप रामभाऊ दरेकर. |
| न्यायनिर्णय घोषित करण्याचा दिनांक | ०५/०८/२०२६. |
| न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक | ०५/०८/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | ०५/०८/२०२६. |